**( महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ )**

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस -/१२९७/ १३१९/ सीआर - १४८/ ९७/ नवि -१२, दि. ४ ऑक्टोबर १९९९ अन्वये मंजूर झाली असून, दि. २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली आहे. तसेच विकास योजनेतील वगळलेल्या भागांस (Excluded Portion) शासन निर्णय क्र. टि.पी.एस. -१२०१/२७४/सी.आर-२८/२००९/नवि-१२, दि. ३ एप्रिल २००३ अन्वये मंजुरी देण्यात आलेली असून, दि. १४मे२००३ पासून या भागांकरीता विकास योजना अंमलात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेसाठी मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टीम (एम.आर. टी.एस.) राबविण्यासाठी सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक केली असून सदर कामी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कन्सल्टींग इंजिनियरींग सर्व्हीसेस इंडीया लि. यांची तज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक केली, कन्सल्टींग इंजिनियरींग सर्व्हीसेस यांनी ठाणे महानगरपालिकेसाठी मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टीम बाबत अहवाल तयार करून सादर केलेला आहे. ठाणे महानगरपालिकेने ठराव क्र. ११९ , दि. २० जून २००१ रोजी हिरव्या रंगाने दर्शविलेला मार्गाबाबत ठराव पारित केलेला आहे. आणि ज्याअर्थी उक्त योजनेत सदर फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी ठाणे महानगरपालिकेने ठराव क्र. ४४८ दि. १२ नोव्हेंबर २००१ आणि त्यानंतर ठराव क्र. २८७, दि. १८ सप्टेंबर २००२ अन्वये मंजूर विकास योजनेत सदर फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करण्याचे ठरविले होते. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेने नागरीकांच्या हरकती /सुचना प्राप्त करणे करीता दि. ११ ऑक्टोबर २००२ रोजी वृत्तपत्रात व शासन राजपत्रात सुचना प्रसिध्द केली होती.

त्यानुसार विहीत मुदतीत काही हरकती व सुचना प्राप्त झाल्या होत्या. सदर फेरबदलाची वैधानिक कार्यवाही अद्याप पर्यंत पुर्ण न झाल्याने व पुर्वीची जाहीर सूचना प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून बराच कालावधी झाल्याने ठाणे महानगरपालिकेने सदर जाहिर सुचना फेर प्रसिध्द करून नागरिकांकडून सुचना / हरकती मागविण्याचे ठरविलेले आहे. ज्या अर्जदारांनी यापुर्वीच सुचना / हरकती ठाणे महानगरपालिकेकडे दिलेल्या आहेत. त्यांनी त्यांच्या सुचना /हरकती पोचसह फेर सादर कराव्यात तसेच इतर नागरींकांना आता प्रसिध्द केलेल्या जाहिर सुचनेच्या अनुषंगाने आपल्या सुचना / हरकती सादर करता येतील, प्राप्त सर्व सुचना / हरकतींचा सुनावणीसाठी विचार करण्यात येईल.

त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये प्रस्तावित फेरबदलाबाबत नव्याने सुचना/हरकती जनतेकडून मागविण्यासाठी ही सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रस्तावित फेरबदलाचे नकाशे सहाय्यक संचालक नगर रचना, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका, डॉ. अल्मेडा रोड,पाचपाखाडी, ठाणे यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात आले आहेत. प्रस्तावित फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सुचना/हरकत घ्यावयाची असल्यास त्याने ही सुचना स्थानिक वर्तमानपत्रात आणि महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसात सहाय्यक संचालक नगर रचना, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका यांच्याकडे सादर कराव्यात.

उप नगर अभियंता,
विकास योजना अंमलबजावणी कक्ष,
ठाणे महानगरपालिका, ठाणे